**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्टं सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक ३०५ । शनिवार ५ सप्टेंबर २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# जिल्हा सहकारी बँकेत मयताच्या खात्यातील रकमेचा अपहार

## महिला क्लर्कवर पारनेर पोलिसांत गुन्हा दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या टाकळी ढोकेश्वर शाखेत कार्यरत असलेल्या एका महिला क्लर्कने आपल्या मयत सासऱ्याच्या बँक खात्यातून वारस तपासणी अथवा कायदेशीर प्रक्रिया न करता शासकीय योजनेचे ३१ हजार रुपये परस्पर काढून घेत बँकेची व शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अक्षय बाबाजी ढोकळे (वय ३५, रा. खडकवाडी, ता. पारनेर) यांनी फिर्याद दिली असून, ते २०१९ ते २०२४ या काळात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ज्युनिअर ऑफिसर म्हणून कार्यरत होते. टाकळीढोकेश्वर शाखेत काम करत असताना, तेथील महिला क्लर्क मीरा ज्ञानदेव खंडाळे (ऊर्फ मीरा शंकर पावडे, रा. वनकुटे) यांच्या सासऱ्यांचे प्रभाकर काशिनाथ पावडे ११ मार्च २०२० रोजी निधन झाले होते.

निधनानंतरही प्रभाकर पावडे यांच्या बचत खात्यावर श्रावणबाळ योजना आणि पीएम किसान योजनेची शासकीय रक्कम जमा होत होती. तहसीलदार यांच्या नियमावलीनुसार मयत वारस हक्क प्रकरण करणे बंधनकारक असताना, तसे न करता मीरा खंडाळे यांनी १७ ऑगस्ट २०२१ रोजी बनावट स्वाक्षरी व कागदपत्रांच्या आधारे मयताच्या बँक खात्यातील ३१ हजार रुपयांची रक्कम परस्पर काढून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वापरली.

हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर ढोकळे यांनी बँकेचे तालुका विकास अधिकारी इंद्रभान शेळके यांना तोंडी कल्पना दिली होती, मात्र त्यांनी संबंधित महिला कर्मचाऱ्यावर कोणतीही कारवाई केली नाही.

### पोलीस अधीक्षकांच्या परवानगीने गुन्हा दाखल

अखेर या फसवणुकीबाबत दिलेल्या तक्रार अर्जाची चौकशी पूर्ण झाल्यानंतर पोलीस अधीक्षक यांच्याकडून गैरअर्जदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची रीतसर परवानगी प्राप्त झाली. त्यानंतर ४ सप्टेंबर रोजी पारनेर पोलीस ठाण्यात आरोपी महिला क्लब मीरा ज्ञानदेव खंडाळे यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पारनेर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# शेवगावात अवैध वाळू वाहतूकीवर कारवाई

## एलसीबीकडून पाच लाखांचा मुद्देमाल जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने शेवगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाळूची अवैध वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त करून एका आरोपीला ताब्यात घेतले. या कारवाईत एकूण ५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दिनांक ४ सप्टेंबर रोजी एलसीबीचे पथक शेवगाव हद्दीत गस्तीवर असताना, हातगाव शिवारात एका ट्रॅक्टरद्वारे अवैध वाळूची वाहतूक होत असल्याची ■ पान ४ वर

# बेलवंडीत रविवारी रंगणार भव्य दहीहंडी उत्सव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथे लोकनेते अण्णासाहेब शेलार सोशल फाउंडेशन आणि लोकनियुक्त युवा सरपंच ऋषिकेश शेलार यांच्या संकल्पनेतून रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवासाठी लावणी सम्राज्ञी हिंदवी पाटील, 'सुख म्हणजे नक्की काय असतं' फेम अभिनेत्री गिरीजा ओक यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच महाराष्ट्रातील नामवंत गोपाळ पथकांचा सहभाग या उत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. दहीहंडी फोडणाऱ्या विजेत्या पथकासाठी १ लाख ११ हजार १११ रुपयांचे प्रथम पारितोषिक ठेवण्यात आले आहे. त्यामुळे परिसरातील गोपाळ पथकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. **बालगोपाळ व तरुणांसाठी** ■ पान ४ वर

# महागाईच्या विरोधात राष्ट्रवादीच्या महिला रस्त्यावर; जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## जीवनावश्यक वस्तू, गॅस व इंधनाचे दर कमी करण्याची मागणी; केंद्र–राज्य सरकारच्या धोरणांचा निषेध




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केंद्र व राज्य सरकारच्या महागाईविरोधी धोरणांचा निषेध करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला शहराध्यक्ष अर्चना गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी महागाई नियंत्रणासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी करणारे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, सर्वसामान्य नागरिक, महिला गृहिणी, शेतकरी, कामगार तसेच मध्यमवर्गीय कुटुंबे वाढत्या महागाईच्या तडाख्याने त्रस्त झाली आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती, घरगुती खर्चातील वाढ आणि उत्पन्नाच्या तुलनेत वाढणारा खर्च यामुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. महागाईचा सर्वाधिक परिणाम घर चालविणाऱ्या महिलांवर होत असून स्वयंपाकघराचे बजेट सांभाळताना महिलांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शासनाने केवळ आश्वासने न देता महागाई नियंत्रणासाठी ठोस आणि तातडीची पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली. साखर, खाद्यतेल, डाळी, धान्य, भाजीपाला यांसह जीवनावश्यक वस्तूंचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणावेत, घरगुती गॅसच्या दरात मोठी कपात करावी, तसेच पेट्रोल व डिझेलवरील कर कमी करून इंधनाचे दर कमी करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

तसेच गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी प्रभावी आर्थिक मदत व सवलती जाहीर कराव्यात, काळाबाजार, साठेबाजी व कृत्रिम दरवाढ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्याचा दर्जा व वितरण व्यवस्था अधिक सक्षम करावी, अशी मागणीही करण्यात आली.

महिलांवरील वाढता आर्थिक भार लक्षात घेऊन महिला केंद्रित महागाई नियंत्रणाच्या उपाययोजना ■ पान ४ वर

# अहिल्यानगरमध्ये गणेशोत्सवाची जय्यत तयारी

## गणेशमूर्ती निर्मितीला वेग, महिलांना मिळतो रोजगार । 'स्वप्निल आर्ट'च्या मूर्तींना देशभरातून मोठी मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अगदी काही दिवसांवर आलेल्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्रासह अहिल्यानगरमध्येही गणेशमूर्ती निर्मितीचा धूमधडाका सुरू झाला आहे. लहान मूर्तींपासून ते अतिभव्य मूर्तींपर्यंत प्रत्येक स्वरूपातील गणपती मूर्ती तयार करण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. अहिल्यानगर परिसरातील विविध मूर्ती निर्मिती कारखान्यांमध्ये मूर्तिकार आणि कुशल कारागीर अहोरात्र परिश्रम घेत असून दिवस–रात्र मूर्ती साकारत आहेत.

गणेशोत्सव अगदी जवळ आलेला असतानाही मूर्तिकारांनी आशावादाने पुन्हा कामाला वेग दिला असून मूर्ती तयार करण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे.

एका मूर्तीच्या मागे अनेक तासांचे कौशल्य आणि परिश्रम गुंतलेले असतात. मूर्तीकलेतील बारकावे, चेहर्यावरील भाव, शरीराची डौलदार मांडणी, सजावट यासाठी कलाकारांचे सामूहिक काम सुरू आहे.

नगर शहरातील 'स्वप्निल आर्ट' हा कारखाना मूर्ती निर्मिती क्षेत्रात अत्यंत नावाजलेला असून गेली अनेक वर्षे देशभरातील गणेशभक्तांच्या मनात स्वतः चे स्थान निर्माण करण्यात यशस्वी ठरला आहे. या कारखान्यातून तयार होणार्या मूर्तींना केवळ अहिल्यानगर जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये – जसे की मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर – तसेच मध्यप्रदेश, कर्नाटक, गोवा, गुजरात, तेलंगणा, छत्तीसगड,ओरिसा या राज्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. 'स्वप्निल आर्ट'चे प्रमुख प्रफुल लाटणे हे वर्षभर मूर्तीनिर्मितीची तयारी करत असतात. ते मूर्तींचे डिझाईन, कलात्मक मांडणी, पर्यावरणपूरक ■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक

### लिटिल स्कॉलर्स स्कूलमध्ये बाळगोपाळांनी फोडली दहीहंडी



अहिल्यानगर- तपोवन रोड येथील लिटिल स्कॉलर्स प्रि-प्रायमरी स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. चिमुकल्या बाळगोपाळांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत दहीहंडी उत्सवाचा आनंद लुटला. यावेळी शाळेच्या परिसरात उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते.दहीहंडीचा कार्यक्रम पाहण्यासाठी तपोवन रोड तसेच लक्ष्मी कॉलनी परिसरातील नागरिक, पालक आणि विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. चिमुकल्या विद्यार्थ्यांचा उत्साह पाहून उपस्थित पालकांनी त्यांना प्रोत्साहन दिले. श्रीकृष्ण, राधा तसेच गोपाळांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.यावेळी शाळेच्या प्राचार्या संगीता जाधव यांनी विद्यार्थ्यांना दहीहंडी उत्सवाचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व समजावून सांगितले. तसेच भगवान श्रीकृष्णाच्या बाललीला, गोपाळकाला आणि कृष्णाच्या विविध लीला यांची माहिती विद्यार्थ्यांना सोप्या व रंजक पद्धतीने दिली. सण-उत्सवांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती आणि परंपरांची ओळख करून देण्याचा शाळेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत दहीहंडी उत्सवात आनंदाची भर घातली. पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सणाचा आनंद घेण्याबरोबरच त्यामागील संस्कृती आणि परंपरांची माहिती मिळाली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या प्राचार्या संगीता जाधव, स्मिता थोरात, नम्रता गोळे आणि साक्षी भांड यांनी विशेष परिश्रम घेतले. पालक व परिसरातील नागरिकांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

### धुळे रोटरी क्लब प्रस्तुत फिनिक्स क्लब चॅम्पियन

अहिल्यानगर- रोटरी क्लब प्रस्तुत फिनिक्स कप नॉर्थ महाराष्ट्र रीजनल चॅम्पियनशिप २०२६ टेबल टेनिस स्पर्धेत धुळे येथे २९-३० ऑगस्ट २०२६ रोजी पार पडल्या.



या स्पर्धेत स्मॅश अकॅडमी संघाने ४ सुवर्ण पदक,२ रौप्य पदक व २ कांस्य पदक पटकावले. साक्षात शर्मा याने ११ वर्ष वयोगट मुले यात सुवर्ण पदक मिळविले. ईश्वरी पाटीलच्या उत्तम कामगिरीमुळे १५ वर्ष, १७ वर्ष व १९ वर्ष वयोगट मुली या तिन्ही गटात सुवर्ण पदक पटकावले. अवंती तोरडमल हिने १३ वर्ष वयोगट मुलींमध्ये रौप्य पदक जिंकले. निरवी देवळालीकरने १५ वर्ष वयोगट मुलींमध्ये रौप्य पदक मिळवले. अद्वैत जोशी याने १३ वर्ष वयोगट मुले यात कांस्य पदक मिळवले. वेदांत शितोळे याने १५ वर्ष वयोगट मुले यात कांस्य पदक मिळवले. अभिजीत ससाणे याने आपले उत्तम कामगिरी उपांत्यपूर्व फेरी पर्यंत दाखवली. निधीश भंडारे, हृदया भंडारे, आराध्य भागवत, हर्षवर्धन मोरे यांनी आपल्या खेळाने प्रेक्षकांची मने जिंकली. वरील सर्व खेळाडूंना स्मॅश टेबल टेनिस अकॅडमीचे प्रशिक्षण लाभले.

### बिजलाबाई झावरे यांचे अल्पशा आजाराने निधन

पारनेर - तालुक्यातील वासुंदे येथील रहिवासी व पारनेर तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष, दैनिक लोकमतचे तालुका प्रतिनिधी शरद झावरे यांच्या मातोश्री श्रीमती बिजलाबाई भिमाजी झावरे यांचे गुरुवार दि ३ सप्टेंबर रोजी सकाळी निधन झाले आहे. निधनासमयी त्यांचे वय ८० वर्षांचे होते.अत्यंत कष्टाने व जिद्दीने आपला प्रपंच फुलवला असुन त्या धार्मिक प्रवृत्तीच्या पण होत्या.त्यांच्या मागे तीन मुले, सुना,एक मुलगी व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या धार्मिक व मनमिळावू स्वभावाच्या होत्या.मुंबई येथील उद्योजक आबासाहेब झावरे माजी ग्रा.प.सदस्य रविंद्र झावरे यांच्या मातोश्री तर पत्रकार बबनराव गायके यांच्या त्या ज्येष्ठ भगिनी होत.



## पोळ्याची तयारी; पैठण शहरातील कुंभारवाड्यात बैल बनविण्याची लगबग, महागाईचे सावट





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** शेतकऱ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा सण असलेल्या बैलपोळ्याची ग्रामीण भागात जोरदार तयारी सुरू झाली आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पोळ्याच्या दिवशी बैलांची पूजा केली जाते. बैल नसलेल्या कुटुंबांकडून मातीच्या बैलांची पूजा करण्याची परंपरा आजही कायम आहे. त्यामुळे पैठण शहरातील कुंभारवाड्यात मातीच्या बैलांना आकार देण्याची लगबग सुरू झाली आहे.

कुंभारवाड्यातील कारागीर चिकणमातीपासून विविध आकारांचे बैल तयार करण्यात व्यस्त आहेत. बैल तयार झाल्यानंतर त्यांना आकर्षक रंग देऊन सजविण्यात येत आहे. पारंपरिक पद्धतीने तयार होणाऱ्या या मातीच्या बैलांना पोळ्याच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांकडून चांगली मागणी असते.

**महागाईमुळे उत्पादन खर्च वाढला**

माती, रंग तसेच इतर साहित्याच्या दरात वाढ झाल्याने मातीचे बैल तयार करण्याचा खर्च वाढला आहे. त्यातच बैल तयार करण्यासाठी लागणारी मेहनतही मोठी असल्याने यंदा त्यांच्या किमतीत काही प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. आकार आणि सजावटीनुसार बैलांच्या जोड्यांची किंमत ठरविली जाते.

**पारंपरिक व्यवसायाला आधुनिकतेची जोड**

पैठणच्या कुंभारवाड्यात आजही अनेक कारागीर मातीच्या वस्तू तयार करण्याचा पारंपरिक व्यवसाय जपत आहेत. बदलत्या काळानुसार मातीच्या बैलांना आकर्षक रंगसंगती आणि वेगवेगळे आकार देण्यात येत आहेत. त्यामुळे पारंपरिक मातीच्या बैलांना नव्या पिढीतील ग्राहकांचीही पसंती मिळत आहे. बैलपोळा सणासाठी पैठण शहरातील कुंभारवाड्यात मातीच्या बैलांना अंतिम रूप देण्याचे काम वेगाने सुरू असून, सण जवळ येताच बाजारात मातीच्या बैलांची विक्री वाढण्याची अपेक्षा कारागिरांकडून व्यक्त होत आहे.

## श्री ढोकेश्वर महाविद्यालयात एन.सी.सी. कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रदीपकुमार बेहेरा यांची भेट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे , श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर येथे १७ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी., अहिल्यानगरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रदीपकुमार बेहेरा यांनी दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी एन.सी.सी. युनिटला भेट दिली.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. वीरेंद्र धनशेट्टी यांच्या हस्ते कर्नल प्रदीपकुमार बेहेरा यांचा ग्रंथ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या भेटीदरम्यान कर्नल प्रदीपकुमार बेहेरा यांनी एन.सी.सी. कॅडेट्सशी संवाद साधून शिस्त, नेतृत्वगुण, राष्ट्रप्रेम, आत्मविश्वास आणि सामाजिक बांधिलकी याबाबत मार्गदर्शन केले. एन.सी.सी.च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास महाविद्यालयातील लेफ्ट. डॉ. शांता गडगे, डॉ. विजय सुरोशी सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर सेवक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कर्नल प्रदीपकुमार बेहेरा यांच्या भेटीमुळे एन.सी.सी. कॅडेट्समध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आले होते.

## श्रावणी चौथ्या शनिवारनिमित्त लक्ष्मी कारंजा मित्र मंडळाचा स्तुत्य उपक्रम

**भाविकांना खिचडीचे वाटप; सामाजिक बांधिलकी जपत मंडळाचा आदर्श**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रावण महिन्यातील चौथ्या शनिवारनिमित्त अहिल्यानगर शहरातील लक्ष्मी कारंजा मित्र मंडळाच्या वतीने भाविकांसाठी खिचडी वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. धार्मिक वातावरणात आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला भाविक तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्रावण महिन्यात विविध धार्मिक उपक्रमांसोबत सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने मंडळाच्या कार्यकर्त्यांनी हा उपक्रम आयोजित केला होता. श्रावण महिन्यात मंदिरांमध्ये दर्शनासाठी तसेच धार्मिक विधींसाठी मोठ्या संख्येने भाविक येत असतात. चौथ्या शनिवारनिमित्त लक्ष्मी कारंजा परिसरातही भाविकांची मोठी गर्दी झाली होती. या पार्श्वभूमीवर मंडळाच्या वतीने भाविकांसाठी गरमागरम खिचडीची व्यवस्था करण्यात आली. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने भाविकांना खिचडीचे वाटप केले. अनेक नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत धार्मिक उत्सवाला सामाजिक सेवेची जोड देण्याचा मंडळाचा प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

या उपक्रमामुळे परिसरात भक्तिमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. भाविकांना प्रसादरूपी खिचडीचे वाटप करताना मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सेवाभाव जपत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. धार्मिक कार्यक्रम हे केवळ उत्सवापुरते मर्यादित न राहता त्यातून समाजोपयोगी उपक्रम राबविले जावेत, या उद्देशाने लक्ष्मी कारंजा मित्र मंडळाच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम घेण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या खिचडी वाटप कार्यक्रमास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष निशांत दातीर,प्रसाद शिंदे, निशांत दातीर, राजू खरपुडे, गिरीश रासकर, जितेंद्र पलीकुंडलीवार, स्वामी गोसावी, कैलास जाधव, नरेश मेरगु, बाळू भागानगरे, संदीप दिवटे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

श्रावण महिन्यातील धार्मिक परंपरा जपत सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या या उपक्रमातून एकोपा, सेवाभाव आणि सामाजिक समतेचा संदेश देण्यात आला. भाविकांनीही उत्स्फूर्तपणे सहभागी होत मंडळाच्या या उपक्रमाला प्रतिसाद दिला. भविष्यातही सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांच्या हितासाठी कार्यरत राहण्याचा संकल्प मंडळाच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

## पद्मशाली समाजातील पदवीधारक व शिक्षकांचा सत्कार समारंभ कार्यक्रमाच्या तारखेत बदल

**गुरुवर्य पोट्यन्ना बतीन शैक्षणिक सामाजिक मंडळाचा उपक्रम; पात्रांनी नावनोंदणी करण्याचे आवाहन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गुरुवर्य पोट्यन्ना बतीन शैक्षणिक सामाजिक मंडळाच्या वतीने पद्मशाली समाजातील शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसह शिक्षकांचा गौरव करण्यासाठी विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता हा समारंभ होणार असून, समाजातील गुणवंत पदवीधारक आणि शिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे.

सन २०२६ या शैक्षणिक वर्षात पदवी, पदविका तसेच पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पद्मशाली समाजातील विद्यार्थ्यांचा या समारंभात सत्कार करण्यात येणार आहे. तसेच शिक्षक दिनाचे औचित्य साधून समाजातील सेवेत कार्यरत असलेल्या तसेच सेवानिवृत्त शिक्षकांचाही विशेष गौरव केला जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाला प्रोत्साहन देण्याबरोबरच शिक्षकांच्या ज्ञानदानाच्या कार्याचा सन्मान करण्याच्या उद्देशाने मंडळातर्फे हा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो.

सत्कारासाठी पात्र असलेल्या पदवीधारकांनी आपल्या शैक्षणिक प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करून मंडळाकडे नावनोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. नावनोंदणीसाठी शंकरराव नक्का (मो. ९८६०८४७१८४, रंगार गल्ली, राधाकृष्ण मंदिराजवळ), नारायण एक्कलदेवी (मो. ९४२३७५०९८४, दातरंग मळा), मारुती अरकल (मो. ९८५०२२९९३१, वसंत टेकडी, नित्यसेवा सोसायटी) तसेच दत्तात्रय जोग (मो. ९२७००२५००३, पाईपलाईन रोड) यांच्याशी संपर्क साधावा.

समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाची दखल घेऊन त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणा देणे आणि शिक्षकांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे पद्मशाली समाजातील सर्व पात्र पदवीधारक, पदविकाधारक, पदव्युत्तर विद्यार्थी तसेच सेवेत कार्यरत आणि सेवानिवृत्त शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन नावनोंदणी करावी, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष नारायण मंगलारम, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर मंगलारम आणि सचिव श्रीनिवास एल्लाराम यांनी केले आहे.

## आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी साकारले सुरक्षित प्रवासाचे 'पुषण'

**स्मार्ट रोड सेफ्टी उपकरणाला प्रथम क्रमांक**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रस्ते सुरक्षेच्या गंभीर प्रश्नावर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अभिनव उपाय शोधत द आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या 'पुषण' या स्मार्ट रस्ते-सुरक्षा उपकरणाने आंतरशालेय उत्पादन विकास स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला. एस.आर.ई.एफ. स्कूल येथे आयोजित या स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि तंत्रज्ञान आधारित दृष्टीकोनाला विशेष दाद मिळाली.

'पुषण' ही स्मार्ट हेल्मेट-ओळख आणि प्रज्वलन-नियंत्रण प्रणाली आहे. दुचाकीस्वाराने हेल्मेट परिधान केले आहे की नाही, हे या प्रणालीद्वारे ओळखले जाते. हेल्मेट परिधान केले असेल तरच दुचाकी सुरू होते; हेल्मेट नसल्यास वाहन सुरू होत नाही. हेल्मेट नाही तर वाहन सुरू नाही' हा या अभिनव प्रकल्पाचा मुख्य संदेश आहे. सौरिश अग्रवाल (इ.९वी) आणि हर्षवर्धन



महाडिक (इ. ८ वी) या विद्यार्थ्यांनी सदर उपकरण साकारले.

या नाविन्यपूर्ण उत्पादनाला पुषण' हे नाव देण्यात आले आहे. वैदिक परंपरेत पूषण हे रस्ते, प्रवास आणि प्रवाशांच्या संरक्षणाशी संबंधित देवता मानली जाते. प्रकल्पाचे नाव आणि त्यामागील उद्देश यांचा सुंदर मेळ साधण्यात आला आहे. वाहतूक नियम असूनही अनेक दुचाकीस्वारांकडून हेल्मेट वापरले जात नाही. ही बाब ओळखून विद्यार्थ्यांनी केवळ जनजागृती न करता तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरक्षित वर्तनाला प्रोत्साहन देणारा प्रत्यक्ष उपाय विकसित करण्याचा प्रयत्न केला. त्यातून 'पुषण'ची संकल्पना साकार झाली.

या प्रकल्पाच्या निर्मिती प्रक्रियेत विद्यार्थ्यांना संकल्पना विकास, मॉडेल निर्मिती, इलेक्ट्रॉनिक्स, डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर आणि उत्पादन विकास यांचा अनुभव मिळाला. या प्रकल्पासाठी शिक्षक अजय खजिनदार आणि प्राची गिरधर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

'पुषण'ला मिळालेला प्रथम क्रमांक हा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, तांत्रिक कौशल्य आणि समस्येकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याच्या क्षमतेचा गौरव आहे. या यशामुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला चालना मिळाली आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा मंगला मुथा, चेअरमन अशोक मुथा, संचालक (प्रशासन) कर्नल आर. सी. राणा, आराधना राणा, ट्रस्टी निर्मल मुथा, अमित मुथा, प्राचार्या दीपिका नगरवाला आदींनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## मुकुंदनगर-फकीरवाडा- दर्गादायरा नागरी सेवा ठप्प प्रकरणाची अल्पसंख्याक आयोगाकडून गंभीर दखल

**जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांना संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे आदेश**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मुकुंदनगर, फकीरवाडा व दर्गादायरा परिसरातील पाणीपुरवठा, कचरा संकलन, स्वच्छता, पथदिवे, आरोग्य आणि इतर अत्यावश्यक नागरी सेवा ठप्प झाल्याच्या गंभीर प्रकरणाची महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाने दखल घेतली आहे. आयोगाने अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना या प्रकरणाची चौकशी करून आवश्यक कार्यवाही करावी आणि त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा, असे आदेश दिले आहेत.

एका घटनेच्या निषेधार्थ महानगरपालिका कामगार युनियनने कामबंद आंदोलन पुकारून मुकुंदनगर, फकीरवाडा व दर्गादायरा परिसरातील नागरिकांना नागरी सुविधा पुरविण्यावर बहिष्कार घातल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी निवेदनाद्वारे केला होता. या आंदोलनामुळे परिसरातील हजारो नागरिकांना पाणीपुरवठा, कचरा संकलन, स्वच्छता, पथदिवे आणि इतर मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले होते.

आंदोलन करण्याचा अधिकार मान्य असला, तरी त्याच्या नावाखाली संपूर्ण परिसरातील अत्यावश्यक नागरी सेवा बंद करता येत नाहीत. पिण्याचे पाणी, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, पथदिवे आणि आरोग्याशी संबंधित सेवा या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी व सार्वजनिक आरोग्याशी थेट निगडित आहेत. त्यामुळे कोणत्याही आंदोलनाच्या काळात या सेवा अखंडित ठेवणे ही महानगरपालिका प्रशासनाची कायदेशीर आणि प्रशासकीय जबाबदारी असल्याची भूमिका निवेदनात मांडण्यात आली होती.



कामगार युनियनने कामबंद आंदोलन पुकारल्यानंतर महानगरपालिका आयुक्तांनी पोलीस प्रशासनाची मदत घेऊन पर्यायी मनुष्यबळ व आवश्यक व्यवस्था उभी करणे गरजेचे होते. आंदोलनामुळे सेवा बाधित झाल्या असल्या, तरी नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहू न देण्याची जबाबदारी शहर प्रशासनाची होती. मात्र, तातडीने पर्यायी व्यवस्था उभारून नागरी सेवा पूर्ववत का करण्यात आल्या नाहीत, याबाबतही आक्षेप नोंदविण्यात आला होता.

या प्रकरणात कामगार युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी सर्वसाधारण सभेत ठराव पारित करून मुकुंदनगर, फकीरवाडा व दर्गादायरा परिसर महानगरपालिका हद्दीतून वगळण्यात यावा, अशी भूमिका मांडल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला होता. शहरातील एखाद्या घटनेच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण परिसरातील नागरिकांच्या नागरी सुविधांवर बहिष्कार घालणे अथवा तो परिसर महानगरपालिका हद्दीतून वगळण्याची मागणी करणे ही लोकशाही आणि समान नागरी हक्कांच्या दृष्टीने गंभीर बाब असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले होते.

एखाद्या घटनेशी कोणताही संबंध नसलेल्या महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि हजारो कुटुंबांना नागरी सुविधांपासून वंचित ठेवणे योग्य नाही. नागरिकांना समानतेने मूलभूत सुविधा पुरविणे हे महानगरपालिकेचे वैधानिक कर्तव्य असून, कोणत्याही आंदोलनामुळे अथवा दबावामुळे विशिष्ट भागातील नागरिकांचे नागरी हक्क हिरावून घेता येणार नाहीत, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले होते. या संपूर्ण प्रकाराबाबत महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव आणि महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या अध्यक्षांकडे निवेदन सादर करून चौकशी व कार्यवाहीची मागणी करण्यात आली होती. त्यामध्ये कामबंद आंदोलनाची वैधानिकता, अत्यावश्यक सेवा बंद करण्याचा निर्णय कोणी आणि कोणत्या अधिकारात घेतला, महानगरपालिका प्रशासनाने कोणती पर्यायी व्यवस्था केली तसेच नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागण्यास कोण जबाबदार आहे, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. ''मुकुंदनगर, फकीरवाडा आणि दर्गादायरा हे अहिल्यानगर शहराचे अविभाज्य भाग आहेत. तेथील नागरिकांना पाणी, स्वच्छता, पथदिवे, आरोग्य आणि इतर नागरी सुविधा मिळणे ही कोणाची मेहरबानी नसून त्यांचा मूलभूत नागरी हक्क आहे. कोणत्याही आंदोलनाच्या नावाखाली संपूर्ण परिसराला सामूहिक शिक्षा देता येणार नाही,'' अशी भूमिका शेख यांनी व्यक्त केली. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाने या तक्रारीची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आणि त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करण्याचे आदेश दिले आहेत. आयोगाच्या आदेशामुळे कामगार युनियनच्या कामबंद आंदोलनासह महानगरपालिका प्रशासनाच्या भूमिकेचीही चौकशी होण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)


The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### परताव्याचा धनादेश न वटल्याप्रकरणी आरोपीस २ महिने कारावास व ३,३०,०५० दंड

अहिल्यानगर - कल्पतरू मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी, केडगाव, अहिल्यानगर यांच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणात न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवत २ महिने साधा कारावास व ३,३०,०५०/- दंडाची शिक्षा सुनावली आहे. नगर येथील मा. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात झालेल्या सुनावणीत आरोपी अजय सुरेश औसरकर यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(२) अन्वये नि.इ. कलम १३८ अंतर्गत दोषी ठरविण्यात आले. कल्पतरू मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटीने दिलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी आरोपीने २,८७,०००/- रकमेचा धनादेश दिला होता. सदर धनादेश बँकेत वटविण्यासाठी सादर केला असता तो अनादरित झाला. त्यानंतर संस्थेच्या वतीने न्यायालयात कायदेशीर कार्यवाही करण्यात आली.या प्रकरणात संस्थेच्या वतीने अशोक दत्तात्रय तांबे यांची साक्ष महत्त्वपूर्ण ठरली. तसेच सादर करण्यात आलेला कागदोपत्री पुरावा आणि संस्थेच्या वतीने ॲड. कौस्तुभ कुलकर्णी यांनी केलेला प्रभावी युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला.न्यायालयाने आरोपीस २ महिने साधा कारावास, ३,३०,०५०/- दंड आणि दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त २ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली.या प्रकरणात कल्पतरू मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी, केडगाव, अहिल्यानगर यांच्या वतीने ॲड. कौस्तुभ कुलकर्णी यांनी काम पाहिले. त्यांना निशांत सोनवणे, अतुल बोराडे व आदित्य रोकडे यांनी सहकार्य केले.सभासदांच्या हिताचे रक्षण, संस्थेच्या आर्थिक शिस्तीचे पालन आणि थकीत कर्जाच्या वसुलीसाठी कायदेशीर मार्गाने प्रभावी पाठपुरावा करणाऱ्या कल्पतरू मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटीचा हा न्यायालयीन विजय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

### लक्ष्मण कुलट यांचे निधन



अहिल्यानगर - खातगाव टाकळी (ता. नगर) येथील रहिवासी आणि सेवानिवृत्त सहायक पोलिस उपनिरीक्षक लक्ष्मण तुकाराम कुलट (वय ९३) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुले आणि एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कान्हूर पठार पतसंस्थेचे लेखापरीक्षक विजयराव कुलट यांचे ते वडील होत.

### श्रीमती कौशल्या टाक यांचे निधन



अहिल्यानगर - केडगाव येथील रहिवासी श्रीमती कौशल्या शंकरराव टाक यांचे शनिवार दिनांक ५ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्या ८० वर्षांच्या होत्या. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पक्षात मुलगा, सून, नातवंडे, पणतू असा परिवार आहे. राजेंद्र टाक यांच्या त्या मातोश्री होत. त्या धार्मिक वृत्तीच्या व मनमिळावू स्वभावाच्या होत्या.

### शंकर भैरी यांचे दु:खद निधन



अहिल्यानगर - श्रमिकनगर येथील रहिवासी वैष्णव पेपर एजन्सीचे प्रोप्रा. शंकर अंबादास भैरी (वय ४२) यांचे २ सप्टेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, पत्नी, २ मुले, सुना, ४ भाऊ, भावजया, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार श्रीनिवास सामल यांचे ते दाजी होत.

# आग्रा येथील ऑल इंडिया शालेय कुस्ती स्पर्धेत शौर्य लष्करेची दमदार कामगिरी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आग्रा येथे झालेल्या १७ वर्षीय ऑल इंडिया शालेय कुस्ती स्पर्धेत अहिल्यानगरच्या शौर्य लष्करे यांनी उत्कृष्ट कुस्तीचे प्रदर्शन करत महाराष्ट्राला रौप्यपदक मिळवून दिले. शौर्य लष्करे हे छत्रपती संभाजी महाराज कुस्ती केंद्राचे मल्ल असून, त्यांच्या या यशाबद्दल आमदार संग्राम जगताप यांच्याकडून कौतुक करण्यात आले.

शालेय शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांनी बालपणापासून आपल्या आवडीच्या क्रीडा क्षेत्रात जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे. विद्यार्थ्यांना विविध क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून घडविले जाते. आज विविध क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रातही सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पैलवान शिवाजी चव्हाण यांनी केले.

आग्रा येथे झालेल्या १७ वर्षीय ऑल इंडिया शालेय कुस्ती स्पर्धेत शौर्य लष्करे यांनी राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करत महाराष्ट्राला रौप्यपदक मिळवून दिले. त्यांच्या या कामगिरीमुळे अहिल्यानगर शहराचे नाव क्रीडा क्षेत्रात उंचावले आहे. शौर्य हे छत्रपती संभाजी महाराज कुस्ती केंद्राचे खेळाडू असून, कोणत्याही क्षेत्रात सातत्य ठेवले तर यश निश्चितपणे मिळते, असा विश्वास पैलवान शिवाजी चव्हाण यांनी व्यक्त केला.

शौर्य लष्करे यांच्या या यशाबद्दल छत्रपती संभाजी महाराज कुस्ती केंद्राच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पैलवान शिवाजी चव्हाण, संदीप गायकवाड, शंभू यादव, अतिश ठाकूर, अजित वाघ, पैलवान युवराज चव्हाण, लक्ष्मण धनगर, अमित गाडे, प्रताप गायकवाड आदींसह खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शौर्य लष्करे म्हणाले की, १७ वर्षीय शालेय कुस्ती स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर खेळण्याची संधी मिळाली आणि त्या माध्यमातून यशही संपादन करता आले. या यशामध्ये प्रशिक्षक तसेच छत्रपती संभाजी महाराज कुस्ती केंद्राचे मोठे योगदान आहे. आगामी काळातही कुस्ती क्षेत्रात चांगली कामगिरी करण्यासाठी अधिक मेहनत घेतली जाईल, असे त्यांनी सांगितले.

शौर्य लष्करे यांच्या या यशामुळे अहिल्यानगरच्या कुस्ती क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी क्रीडा क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



कब्रस्तानातील वृक्ष पाऊस कमी झाल्यामुळे थोडे सुकू लागली आहेत. सद्या वृक्षसंवर्धन कडे लक्ष देऊन पाणी वृक्षा करीता देणे आवश्यक आहे. हाजी हसनशहा कादरी बागवान जमात कब्रस्तान

स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था राज्यस्तरीय

# आठवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन करिता कथालेखक बाळासाहेब देशमुख निमंत्रित



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्व पै किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व पै. नाना डोंगरे व्यायाम शाळा, निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित.. राज्यस्तरीय वे०८ ग्रामीण मराठी साहित्य संमेलन, निमगाव वाघा येथे १० सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न होत आहे. साहित्य संमेलनाध्यक्षपदी साहित्यिक शंकर अंदानी यांची निवड झालेली आहे. कवी संमेलन अध्यक्ष म्हणून जेष्ठ कविवर्य रूपचंद शिदोरे यांची निवड झालेली आहे.

साहित्य संमेलन आयोजक माननीय नाना डोंगरे यांनी पत्र पाठवून, कथालेखक श्री बाळासाहेब देशमुख यांना कथाकथन कार्यक्रमाकरिता निमंत्रित केलेले आहे. कथालेखक बाळासाहेब देशमुख, कथाकथन कार्यक्रमात दुर्गा मावशी ही कथा सांगणार आहेत. जुन्या जमान्यातली दुर्गा मावशी. शिक्षण कमी, जीवनानुभव जास्त. साध्या साध्या गोष्टीतही सर्वांना बोधामृत देणारी. माणुसकीचा गहिवर जागवणारी. एका हाताने केलेला दानधर्म ,दुसऱ्या हाताला कळणार नाही. अशी दक्षता घेणारी. रसिक प्रेक्षकांसमोर सादर करणार आहेत.

बाळासाहेब देशमुखांचे कथाकथन आजवर अहिल्यानगर जिल्ह्यात ५०० प्रयोग पूर्ण झालेले आहेत. शिवाय विविध आकाशवाणी केंद्रावर १२० कथा प्रसारित झालेल्या आहेत. राज्यस्तरीय साहित्य संमेलन मध्ये त्यांचे आजवर ३२ कथाकथन प्रयोग पूर्ण झालेले आहेत.. रंग माझा वेगळा, माणसे अशी.. अन् तशीही... , माणसं भिंगातून... हे तीन कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत.

त्यांचा चौथा कथासंग्रह मोसाईक लवकरच प्रसिद्धीच्या मार्गावर आहे. त्यांच्या या निवडीबद्दल ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत पालवे, बाबुराव उपाध्ये , शशिकांत शिंदे , दादासाहेब कोते ,दिलीप कापसे, डॉ बाळासाहेब कोठुळे यांनी अभिनंदन केले आहे.

साहित्यिक, कवी यांनी १० सप्टेंबर २६ रोजी संमेलना करता,आवर्जून येण्याचे आवाहन, आयोजक श्री नानासाहेब डोंगरे यांनी केलेले आहे.

# धार्मिकतेतून आपला वारसा आणि संस्कृती जोपासली जाते – आमदार संग्राम जगताप

### सारसनगरमध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव व संत ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सव उत्साहात ज्ञानेश्वरी पारायण, शिवलीलामृत पारायण व कीर्तन सोहळ्याने भक्तिमय वातावरण



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सारसनगर येथील राधाकृष्ण मंदिराच्या वतीने श्रीकृष्ण जन्मोत्सव तसेच संत ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, शिवलीलामृत पारायण, हरिपाठ, भजन, प्रवचन आणि कीर्तन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळ्याचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक प्रकाश भागानगरे, प्राध्यापक माणिक विधाते, ह.भ.प. प्रभाताई भोंग, ज्ञानदेव पांडुळे, अवधूत फुलसौंदर यांच्यासह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, महाराष्ट्राची भूमी ही साधुसंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असून आपल्याला अध्यात्मिकतेचा मोठा वारसा लाभला आहे. धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आपली संस्कृती आणि परंपरा जोपासली जाते. आजच्या युवा पिढीला धार्मिकतेची गोडी निर्माण व्हावी, यासाठी आपले सण-उत्सव धार्मिक आणि पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरे केले पाहिजेत.

तसेच ह.भ.प. प्रभाताई भोंग यांच्या माध्यमातून सुसंस्कृत पिढी घडविण्याचे कार्य सुरू आहे, असेही आमदार जगताप यांनी सांगितले. श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त काकड आरती, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, भजनी मंडळाचा भजन संध्या कार्यक्रम, हरिपाठ, कृष्णलीला चरित्र, कृष्ण जन्मोत्सव तसेच कृष्ण जन्माचे काल्याचे कीर्तन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. याशिवाय ह.भ.प. गणेश महाराज बडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन आणि हरिपाठ सोहळा उत्साहात पार पडला. या संपूर्ण धार्मिक सोहळ्याला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रीकृष्ण जन्मोत्सव आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जन्मोत्सवाचा आनंद घेतला. धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून परंपरा, संस्कार आणि अध्यात्मिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला.

# राखी पौर्णिमेच्या पवित्र दिनी अहिल्यानगर कारागृह वर्ग २ कारागृहातील बांधवांनी घेतली व्यसनमुक्तीची सामुहिक शपथ




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** येथील रोटरी क्लब ऑफ अ.नगर व ब्रह्माकुमारीजचे साईबन में मधुबन गीतापाठशाला व्दारे जिल्हा कारागृह अहिल्यानगर वर्ग २ कारागृहातील सर्व बांधवांना राखी बांधण्यात आली. बहिण भावाच्या पवित्र नात्याचे, स्नेह प्रेमाचे प्रतिक म्हणजे राखी. दर वर्षी राखी पौर्णिमा येते. बहिण भावाला राखी बांधते व त्याच्या दीर्घ आयुष्यासाठी आशीर्वाद देते. परंतु सध्या वातावरण बिघडले आहे. समाजामध्ये व्यसन, नशा करण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यामुळे शारिरीक व मानसिक आजार वाढत चालले आहे. त्याला प्रतिबंध करण्यासाठी सर्वांनी व्यसनापासुन दूर राहण्याचा निर्धार करणे आवाश्यक आहे. तरी कृपया सर्वांनी व्यसनमुक्त राहण्याची प्रतिज्ञा करावी असे प्रतिपादन रोटरीच्या माजी अध्यक्षा व ब्रह्माकुमारीज् साईबन में मधुबन सेवाकेंद्राच्या संचालिका डॉ. सुधा कांकरिया यांनी केले. या आवाहानाला प्रतिसाद देत कारागृहातील सर्व बांधवांनी व्यसनमुक्तीची, नशामुक्तीची सामुहिक शपथ घेतली.

डॉ. सुधा कांकरिया, सौ. स्नेहल क्षीरसागर, सौ. साधना देशमुख, श्रीमती मंगल मुथ्था या भगिनींनी सर्वांना सर्वांना राखी बांधली. सुरूवातीस रोटरीचे अध्यक्ष श्री सुहास क्षीरसागर यांनी स्वागत केले. कारागृह अधिक्षक श्री संतोष कवार यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात व्यसनापासून दूर राहणे अत्यंत आवश्यक असून त्यामुळे गुन्हेगारी वाढत चालली आहे. नशेच्या आहारी जाऊन माणुस बर्याच चुका करतो. यामधुन त्याचे वैयक्तिक व सामाजिक नुकसान होते. अनेक व्यक्तींच्या मनावरचा ताबा व्यसनामुळे सुटल्यामुळे गंभीर चुका करतात. व्यसनमुक्त, नशामुक्त जीवन जगणे आवश्यक असुन डॉ. सुधा कांकरिया यांनी 'व्यसनमुक्ती ही आनंदी जीवनाची गुरूकिल्ली' या विषयावर मार्मिक विवेचन केले. मी त्यांचे अभिनंदन करतो. डॉ. सुधा कांकरिया यांनी राजयोगा जीवनपध्दती – मेडिटेशनचे महत्व विशद केले. मनाची शक्ती वाढण्यासाठी तसेच स्वत: मध्ये सकारात्मक परिवर्तन करण्यासाठी सर्वांनी राजयोगा मेडिटेशनचा अभ्यास करावा असे सांगत त्यांनी सर्व बंदयाकडून मेडिटेशनचा सराव करून घेतला. शेवटी वरीष्ठ तुरूंग अधिकारी विजय सोळंके यांनी आभार मानले. त्यावेळेस वैद्यकिय अधिकारी डॉ. सुजाता सानप, मिश्रक हर्षल संजय रेळे आदी उपस्थित होते. गणेश बेरड हवालदार, नंदकुमार शिंदे, समिंद्रा पवार,माधुरी धनाड, संदिप जऱ्हाड,भगवान पोटे, चंद्रशेखर अठरे ई. कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

आत्मविश्वास, कल्पकता आणि अभिव्यक्तीचा अनोखा संगम

# सेंट विवेकानंद प्राथमिक स्कूलमध्ये 'शो अँड टेल' स्पर्धा उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी तसेच त्यांच्यातील आत्मविश्वास, संभाषणकौशल्य आणि सादरीकरण क्षमता विकसित करण्याच्या उद्देशाने सेंट विवेकानंद प्राथमिक स्कूल मध्ये'शो अँड टेल' स्पर्धेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी विविध आकर्षक व ज्ञानवर्धक विषयांचे सादरीकरण केले. जलचक्र, सोलर पॅनल, ट्रॅफिक लाईट, घड्याळ, डॉक्टर, नारळ तसेच ' ' यांसारख्या विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी कल्पकतेने व आत्मविश्वासाने माहिती सादर केली.

कांचन पापडेजा म्हणाल्या की चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने, प्रभावी वक्तृत्वाने आणि उत्कृष्ट सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या भाषिक




कौशल्यासोबतच संवादकौशल्य, निरीक्षणशक्ती, विचारशक्ती आणि मंचावरील आत्मविश्वास वाढण्यास मोलाची मदत होते .

या स्पर्धेसाठी संस्थेचे विश्वस्त श्री सुरेश हिरानंदानी, आणि आरटीओ ऑफिसर प्रियंका चौथे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

तसेच या स्पर्धेसाठी संज्योत औताडे आणि तानिया मुलतानी यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातील आत्मविश्वास, विषयाची मांडणी, कल्पकता आणि अभिव्यक्ती या विविध निकषांच्या आधारे परीक्षण केले. या स्पर्धेत जिजा कांबळे, बानिकौर गुलाटी, स्तवन अल्हाट, फलक हवलदार, अवनी भंडारी, पूर्वा पांडे, यश सुखेजा, आनंदी सरोदे, शिवांश वारुळे व आर्या पवार या विद्यार्थ्यांनी पुरस्कार प्राप्त केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. कनन शिरवाणी आणि सौ. प्रिती कटारिया यांनी प्रभावीपणे केले. शिक्षकांच्या सहकार्याने संपन्न झालेल्या या स्पर्धेमुळे शाळेचा परिसर उत्साह आणि आनंदाने भारावून गेला.

या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. राम मेंघानी, उपाध्यक्ष श्री. रूपचंद मोटवानी, सचिव श्री. गोपाल भागवानी, खजिनदार श्री. दामोधर माखिजा, विश्वस्त श्री. महेश मध्यान, श्री. सुरेश हिरानंदानी, श्री. राजकुमार गुरुनानी व श्री. हरेष मध्यान, तसेच मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा व माधमिक विभागाच्या प्राचार्या गीता तांबे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# मनपा आरोग्य केंद्रातील आरोग्य सुविधा व औषधोपचारांचा नागरिकांनी लाभ घ्यावा – आयुक्त यशवंत डांगे

**डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानाच्या सहाव्या आठवड्यात रेल्वे स्टेशन परिसरात जनजागृती आयुक्त यशवंत डांगे यांनी विद्यार्थ्यांशी साधला प्रश्नोत्तरांचा संवाद**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर साथीचे आजार पसरण्याची शक्यता असताना अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' साप्ताहिक उपक्रमांतर्गत सहाव्या आठवड्यानिमित्त रेल्वे स्टेशन परिसरात घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी तसेच डेंगू आजाराबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून संवाद साधत डेंगू आजाराची कारणे, घ्यावयाची काळजी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत माहिती जाणून घेतली.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाने आरोग्य सेवांच्या बाबतीत चांगले काम केल्यामुळे राज्यातील महापालिका क्षेत्रांमध्ये दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळविले आहे. या कामामध्ये सातत्य टिकवून ठेवणे गरजेचे आहे.

महापालिकेच्या आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून नागरिकांना विविध आरोग्य सुविधा तसेच औषधोपचार उपलब्ध करून दिले जात आहेत. नागरिकांनी या सुविधांचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा. पावसाळ्यामध्ये साथीचे आजार मोठ्या प्रमाणात पसरण्याची शक्यता असते. हे आजार रोखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून आणि परिसरापासून स्वच्छतेला सुरुवात करावी, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शहरात डेंगू आजाराबाबत चांगल्या पद्धतीने जनजागृती होत असून, त्यामुळे रुग्णसंख्येत घट झाल्याचे दिसून येत आहे. नागरिकांचे आरोग्य सदृढ आणि निरोगी राहावे यासाठी महापालिका प्रशासन काम करत असून, नागरिकांच्या घरापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

रेल्वे स्टेशन परिसरात झालेल्या या उपक्रमावेळी आयुक्त यशवंत डांगे, माजी उपमहापौर गीतांजली काळे, नगरसेवक मनोज कोतकर, दत्ता गाडळकर, मयूर बांगरे, नगरसेविका पौर्णिमा गव्हाळे, शिक्षणाधिकारी जुबेर पठाण, मुख्याध्यापक विजय हिंगे, डॉक्टर एच. आर. मुजुमदार, प्रशांत जाधव, वृषाली आरु, विनय शेळके, प्रभाग अधिकारी सतीश पुंड, योगेश औटी आदींसह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले की, आयुक्त यशवंत डांगे यांनी 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियान सुरू करून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे काम केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली असून, डेंगूच्या रुग्णसंख्येतही घट झालेली दिसून येत आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळा ही महापालिकेची शाळा असून, या माध्यमातून चांगले विद्यार्थी घडविण्याचे काम केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी उपमहापौर गीतांजली काळे म्हणाल्या की, साथीचे आजार पसरू नयेत यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून उपाययोजना केल्या जात आहेत. मात्र नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखून घराच्या परिसरात पाणी साठू न देता परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवणे गरजेचे आहे.

# आनंद तीर्थ समवशरण येथे ८ ते १५ सप्टेंबर दरम्यान पर्युषण पर्व महामंगलकारी अनुष्ठान

**विविध कार्यक्रमांतून भाविकांसाठी धार्मिक व अध्यात्मिक पर्वणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पावन भूमीत त्यांचे सुशिष्य अर्हम विज्जा प्रणेता, उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांचा समर्पण चातुर्मास २०२६ अतिशय भक्तीमय वातावरणात संपन्न होत आहे. या चातुर्मासात दि. ८ ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत पर्युषण पर्वाचे महामंगलकारी अनुष्ठान होणार आहे. यात नित्य प्रवचन, कल्पसूत्र वाचन, प्रतिक्रमण, व्रत नाटिका असे विविध कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कोषाध्यक्ष विलास कटारिया यांनी दिली.

महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषिजी म.सा., उपाध्यायश्री पूज्य प्रवीणऋषिजी म.सा., पूज्य आलोकऋषिजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषिजी म.सा. , पूज्य सत्यप्रभाजी म.सा., पूज्य अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या पावन सान्निध्यात पयुर्षण पर्व अनुष्ठानचे कार्यक्रम आनंद तीर्थ समवशरण येथे होतील. समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती व अहिल्यानगरचे सुपुत्र सौरभ हेमराजजी बोरा, राखी सौरभ बोरा, प्रमिलाबाई हेमराजजी बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

पर्युषण पर्वात ८ ते १५ सप्टेंबर या कालावधीत दररोज सकाळ पासून ते रात्री पर्यंत विविध कार्यक्रम होणार आहेत. उपाध्यायश्रींचे दररोज विविध विषयांवरही उद्बोधक मार्गदर्शन होईल.

रविवार दि.६ सप्टेंबर रोजी पयुर्षण क्यो? , सोमवार दि. ७ सप्टेंबर रोजी पर्युषण कैसे मनाये ? , मंगळवार दि. ८ सप्टेंबर रोजी खुद का आत्म साक्षात्कार करें , बुधवार दि. ९ सप्टेंबर रोजी अंतरात्मा को शुद्ध करें , गुरूवार दि. १० सप्टेंबर रोजी स्वयं मजबूत बनें, समाज को सशक्त बनायें , शुक्रवार दि. ११ सप्टेंबर रोजी अपने जीवन के वास्तूकार स्वयं बने, शनिवार दि. १२ सप्टेंबर रोजी विराम से जुडाव , रविवार दि. १३ सप्टेंबर रोजी विश्व से असीम ऊर्जा प्राप्त करे, सोमवार दि. १४ सप्टेंबर रोजी मित्र बने– मित्र बनाए, मंगळवार दि. १५ सप्टेंबर रोजी संवत्सरी – दिव्य नववर्ष या विषयांवर प्रवचन होईल.

पर्युषण पर्वात शनिवार दि. १२ सप्टेंबर रोजी दुपारी २ ते ४ यावेळेत भगवान महावीर जन्म कल्याणक वांचन अनुष्ठान होईल, त्याच दिवशी रात्री जन्मकल्याणक ची अद्वितीय जिवंत प्रस्तुती सादर केली जाईल. तसेच १रविवार १३ तारीख रोजी १८ वर्षांपर्यंतच्या मुला – मुलीं साठी ऐवंता आलोयणा ची संगीतमय प्रस्तुती आहे. पर्युषण पर्व काळात सर्वांसाठी पांढऱ्या रंगाचा ड्रेस कोड असणार आहे. पर्युषण पर्व आत्म कल्याणकारी पर्व आहे. या काळात अधिकाधिक श्रावक, श्राविकांनी तपस्या उपवास करून आत्मशुद्धी करावी. आचार्यश्रींच्या पावन भूमीतील पर्युषण पर्व अतिभव्य तपस्येचे झाले पाहिजे. प्रत्येकाने आपल्या व्यस्त जीवनातून स्वतः साठी, स्वतःच्या आत्म कल्याणासाठी तसेच धर्मासाठी आवर्जून वेळ काढत मोठ्या संख्येने या काळातील सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहावे असे आवाहन उपाध्यायश्री पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांनी केले आहे.

या पावन पर्युषण पर्वातील सर्व कार्यक्रमांना श्रावक श्राविकांनी सहपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटीचे सदस्यांनी केलं आहे.

# विद्यार्थ्यांचे भविष्य,करिअर, रोजगारक्षम बनविणारे ओजेटी प्रभावी माध्यम– प्रा.डॉ.शेख

**एकता कॉलेजमध्ये ऑन जॉब ट्रेनिंग विषयावर कार्यशाळा**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सर्व विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानवृद्धीतील बदलत्या गरजा लक्षात घेता,त्यांचे भविष्य, करिअर, रोजगारक्षम अधिक सक्षम बनविणारे ऑन जॉब ट्रेनिंग (ओजेटी)हे प्रभावी माध्यम असल्याचे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील लोकसेवा महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.परवेझ शेख यांनी केले.

सावेडी उपनगरातील तपोवन रोडवरील एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय येथे ओजेटी (ऑन जॉब ट्रेनिंग) या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेस प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील लोकसेवा एज्युकेशन सोसायटीचे कला आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लियाकत शेख, उमरगा धाराशिव येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाचे गणित विभाग प्रमुख डॉ.जगदीश नन्नवरे,कडा आष्टी येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे डॉ.दत्तात्रय बोडखे, लोकसेवा महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.परवेझ शेख, एकता महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.राजेंद्र मेहेत्रे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना लियाकत शेख यांनी ओजेटी म्हणजे काय, त्याचे स्वरूप कसे असते, याबाबत माहिती दिली. यावेळी श्रीकृष्ण महाविद्यालय उमरगा धाराशिव येथिल गणित विभाग प्रमुख डॉ.नन्नवरे यांनी स्कोप ऑफ ओजेटी इन ऑल फॅकल्टीज या विषयावर आपले विचार मांडले. ओजेटी ची उपयुक्तता केवळ एका विशिष्ट शाखेपुरती मर्यादित नसून विविध विद्या शाखांमध्ये त्याची प्रभावी अंमलबजावणी करता येते. विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयाशी संबंधित प्रत्यक्ष अनुभव मिळण्यासाठी ओजेटी महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी कडा (आष्टी) येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय येथील डॉ.बोडखे यांनी इम्पॉर्टंट ऑफ ओजेटी या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सैद्धांतिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष कार्यानुभव आवश्यक असतो ओजेटी मुळे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य, आत्मविश्वास आणि व्यावसायिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते. असे ते म्हणाले. डॉ.शेख यांनी चॅलेंजेस अँड ऑपरटूनिटीस इन ओजेटी या विषयावर मार्गदर्शन केले.ओजेटी राबविताना येणारी विविध आव्हाने तसेच त्यातून निर्माण होणाऱ्या संधी यावर त्यांनी प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी आव्हानांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करावा,असे आवाहन त्यांनी केले.

**मुलांमध्ये अंतराळ विज्ञानाची गोडी निर्माण करण्यासाठी 'तारांगण आपल्या शाळेत' उपक्रम**

# अंतराळवीर आणि वैज्ञानिक घडण्याची प्रक्रिया शालेय जीवनापासून सुरू व्हावी - इंजि. प्रदीप तांदळे

**पोलाद स्टीलच्या सहकार्याने एसा संस्थेचा वर्षभर उपक्रम; ६०० विद्यार्थिनींनी घेतली कृत्रिम अवकाशाची सफर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** मुलांमध्ये अंतराळ आणि भूगोल शास्त्राविषयी जागृती निर्माण व्हावी, अवकाश संशोधन व चांद्रयान अभियानाची माहिती मिळावी तसेच या क्षेत्राची आवड निर्माण होऊन भविष्यातील अंतराळवीर आणि वैज्ञानिक घडण्याची प्रक्रिया सुरू व्हावी, या उद्देशाने पोलाद स्टील, जालना आणि आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'तारांगण आपल्या शाळेत' हा उपक्रम वर्षभर राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाची सुरुवात केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात प्लॅनिटोरियम अर्थात तारांगण उभारून करण्यात आली.

याबाबत माहिती देताना एसा संस्थेचे अध्यक्ष इंजि. प्रदीप तांदळे यांनी सांगितले की, पोलाद स्टीलच्या सहकार्याने हा उपक्रम वर्षभर अहिल्यानगरमधील विविध शाळांमध्ये राबविण्यात येणार आहे. मुलांना अवकाश संशोधन, चांद्रयान अभियान यासह अंतराळातील विविध घडामोडींची माहिती प्रत्यक्ष अनुभवातून मिळावी आणि त्यांच्यामध्ये या विषयाविषयी कुतूहल निर्माण व्हावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

पोलाद स्टील, जालना यांनी यासाठी नऊ-दहा व्हॅन तयार करून घेतल्या आहेत. या व्हॅनमध्ये तंबू तसेच तारांगणाशी संबंधित आवश्यक साहित्य उपलब्ध आहे. या कृत्रिम तारांगणामध्ये एकावेळी विद्यार्थ्यांना सुमारे ३० ते ४० मिनिटे बसून कृत्रिम अवकाशात चांद्रयान मोहीम, सूर्यमाला, अवकाश संशोधन यासह विविध विषयांवरील व्हिडिओ पाहता येतात. २० फूट बाय २० फूट आणि १२ फूट उंचीच्या तंबूमध्ये विद्यार्थ्यांना आपण प्रत्यक्ष अवकाशात असल्याचा अनुभव मिळतो.

पोलाद स्टील कंपनीचे मार्केटिंग अधिकारी आदेश गुंगे यांनी सांगितले की, सामाजिक कार्य म्हणून पोलाद स्टील कंपनी मागील कित्येक वर्षांपासून हा उपक्रम राबवत आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल जागृत करून त्यांना कृत्रिम अवकाशाची सफर घडवून आणण्याचे काम केले जात आहे.

पूर्वी तारांगण आणि प्लॅनिटोरियमचा अनुभव घेण्यासाठी बंगळुरू, मुंबई तसेच अहिल्यानगरजवळील धनगरवाडी येथील स्पेस ओडिसी प्लॅनिटोरियम येथे जावे लागत होते. मात्र त्यासाठी लागणारा खर्च, वेळ आणि अंतर यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांना हा अनुभव सहज घेता येत नव्हता. पोलाद स्टील कंपनीने सुरू केलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मोफत आणि थेट आपल्या शाळेतच तारांगण पाहण्याची व अनुभवण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

पोलाद स्टीलचे मार्केटिंग अधिकारी आदेश गुंगे यांनी सांगितले की, कंपनीच्या या व्हॅनच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध वाड्या-वस्त्यांवरील तसेच दुर्गम भागातील शाळांमधील विद्यार्थ्यांना तारांगणाचा अनुभव देण्यात येत आहे. आतापर्यंत २२०० पेक्षा अधिक शाळांनी या उपक्रमाचा लाभ घेतला असून, एका दिवसात सुमारे ७०० ते ८०० विद्यार्थी या माध्यमातून अवकाश सफर करू शकतात.

एसा आणि पोलाद स्टीलतर्फे वर्षभर विविध शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाची सुरुवात महाराणी ताराबाई कन्या विद्यालयातून करण्यात आली. शाळेतील प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील एकूण ६०० विद्यार्थिनींना (४५० + १५०) सुमारे १५ मिनिटे चालणाऱ्या क्लिपच्या माध्यमातून अंतराळाचे दर्शन घडविण्यात आले.

यामध्ये चांद्रयान मोहीम तसेच भविष्यात भारताकडून २०४० साली मानवाला चंद्रावर उतरविण्यासाठी करण्यात येत असलेल्या मोहिमेची माहिती दाखविण्यात आली. ही दृश्ये पाहताना विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद, त्यांच्या घोषणा आणि उत्साहामुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वासंती धुमाळ यांनी आपणास यापूर्वी बंगळुरू येथे तारांगण पाहण्याची संधी मिळाल्याचे सांगितले. पोलाद स्टील आणि एसा यांनी हा प्रकल्प नगरमधील कन्या शाळेत राबविल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये कुतूहल जागृत होऊन या क्षेत्राविषयी आवड निर्माण होते आणि भविष्यातील अंतराळवीर घडण्याची सुरुवात शालेय जीवनापासून होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

यावेळी शाळेचे उपमुख्याध्यापक संजयकुमार हरिश्चंद्र निक्रड यांनी शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच केडगावमधील मुलींची ही पहिली शाळा असल्याचे त्यांनी सांगितले.

एसा संस्थेचे सचिव भूषण पांडव यांनी हा उपक्रम एसा आणि पोलाद स्टीलच्या माध्यमातून वर्षभर अहिल्यानगरमध्ये राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. या उपक्रमाचा लाभ आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी संस्था चालक अथवा मुख्याध्यापकांनी पोलाद स्टीलचे प्रतिनिधी आदेश गुंगे– ९८८१५४१८९९ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

(पान १ वरून)

## शेवगावात अवैध वाळू वाहतूकीवर कारवाई

गोपनीय माहिती मिळाली. पथकाने तात्काळ हातगाव ते शेवगाव जाणाऱ्या रस्त्यावर सापळा रचून संशयित ट्रॅक्टर अडवला. तपासणीदरम्यान ट्रॅक्टरमध्ये बेकायदेशीर वाळू आढळून आली. याप्रकरणी चालक कुलदीप विनायक जाधव (वय ३२, रा. बोरगाव, ता. गेवराई, जि. बीड) यास ताब्यात घेण्यात आले.

परवान्याबाबत विचारपूस केली असता, ट्रॅक्टर मालक आकाश संभाजी जाधव (रा. बोरगाव, ता. गेवराई, जि. बीड – फरार) याच्या सांगण्यावरून ही वाहतूक करत असल्याचे त्याने कबूल केले.

पोलिसांनी ५ लाख रुपये किमतीचा विनाक्रमांकाचा ट्रॅक्टर-ट्रॉली आणि १० हजार रुपयांची वाळू असा एकूण ५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई एसपींच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदार सुनील पवार, अशोक लिपणे, बाळासाहेब खेडकर आणि भगवान सानप यांच्या पथकाने केली.

## बेलवंडीत रविवारी रंगणार भव्य दहीहंडी उत्सव

**उत्सवाची पर्वणी** बालगोपाळ आणि तरुणांच्या आग्रहाखातर सुरू करण्यात आलेल्या या दहीहंडी उत्सवाचे यंदा तिसरे वर्ष आहे. ग्रामीण भागातील तरुणांसह महिलांसाठीही हा उत्सव एक पर्वणी ठरत आहे. ग्रामीण परंपरा, संस्कृती आणि उत्सवाची परंपरा जपण्याचे काम या माध्यमातून सातत्याने केले जात असल्याचे सरपंच ऋषिकेश शेलार यांनी सांगितले. या भव्य दहीहंडी उत्सवासाठी बेलवंडी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन लोकनियुक्त सरपंच ऋषिकेश शेलार यांनी केले आहे.

## महागाईच्या विरोधात राष्ट्रवादीच्या महिला रस्त्यावर; जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

राबवाव्यात. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव आणि ग्राहकांना वाजवी दरात वस्तू मिळतील, अशी प्रभावी बाजारव्यवस्था निर्माण करावी. केंद्र व राज्य सरकारने महागाई नियंत्रणासाठी तातडीने ठोस कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली.

महागाईच्या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी यापेक्षाही तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला.

यावेळी महिला शहराध्यक्ष अर्चना गायकवाड, उपाध्यक्ष वेणूबाई वाणी, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अथर खान, जिल्हा कार्याध्यक्ष समीर पठाण,शहर कार्याध्यक्ष अजहर शेख जिल्हा उपाध्यक्ष मतीन शेख, वर्षा सगळगिरे, अलका वाकडे, अर्चना रत्नपारखे, अर्चना शिंदे, गायत्री गायकवाड, कोमल मस्के, सायरा सय्यद, रशीदा शेख, जायदा मिर्झा आदींसह पदाधिकारी व महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## अहिल्यानगरमध्ये गणेशोत्सवाची जय्यत तयारी

सामग्रीचा वापर, ग्राहकांच्या मागणीनुसार विशेष आकार व सजावट याकडे बारकाईने लक्ष देतात.

या कारखान्यात विशेष बाब म्हणजे येथे महिलांनाही रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या ठिकाणी १५ महिला गणेश मूर्ती बनविण्याचे काम करत आहे .मूर्ती निर्मितीच्या विविध टप्प्यांमध्ये – जसे की रंगकाम, अलंकार सजावट, नक्षीकाम, थर देणे – या सर्व प्रक्रियांमध्ये महिलांचा मोठा सहभाग आहे. त्यामुळे अनेक महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होण्याचा मार्ग उपलब्ध झाला आहे. पुरुषांप्रमाणेच त्या खांद्याला खांदा लावून काम करत असून त्यांचा आत्मविश्वास आणि कौशल्य दोन्ही लक्षणीय आहे.

मूर्ती निर्माण करताना कारागीर आणि मूर्ती यांच्यात एक खास भावनिक नातं निर्माण होतं. कलाकार जेव्हा एका मातीच्या गोळ्याला हळूहळू सजीव रूप देतो, तेव्हा तो केवळ एक वस्तू घडवत नाही, तर श्रद्धेचा एक केंद्रबिंदू घडवत असतो. मूर्ती घडवण्याच्या या प्रक्रियेत एक विलक्षण ऊर्जा, एक सकारात्मक वातावरण निर्माण होतं, जे पाहणार्याला सुद्धा भारावून टाकतं.

'स्वप्निल आर्ट' या कारखान्याचे वैशिष्ट्य म्हणजे इथे केवळ गणेशमूर्तीच नव्हे तर नवरात्रोत्सवासाठी देवी मूर्ती, सार्वजनिक मिरवणुकांतील देखावे, इतर धार्मिक प्रसंगांसाठी मूर्ती आणि सजावट साहित्यही वर्षभर निर्मिती केली जाते. त्यामुळे हा कारखाना केवळ एक व्यवसाय न राहता कला, परंपरा आणि भक्तीचा संगम ठरला आहे.

गणेशोत्सव साजरा करताना घराघरात विराजमान होणार्या गणपतीमागे अशा कारागीरांची मेहनत, समर्पण आणि भावनिक नाळ दडलेली असते. त्यांचा हा संघर्ष आणि कलेवरील प्रेम या उत्सवात खर्या अर्थाने जीव ओततात. त्यामुळे अहिल्यानगर सारख्या ठिकाणीही आज भारतभर प्रसिद्धी मिळालेल्या मूर्तिकारांची कला आणि संस्कृतीचा वारसा जपत ठेवला जात आहे.